ज्ञानगंगा घरोघरी

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

(महाराष्ट्र शासनाने वर्ष १९८९ मध्ये स्थापिलेले)
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक - ४२२२२२
ई-मेल : kusumagrajchair@ycmou.ac.in


**डॉ. दिलीप धोंडगे**
प्रमुख
कुसुमाग्रज अध्यासन



**कुसुमाग्रज अध्यासन**

## <u>अहवाल</u>

## नववर्षाच्या स्वागताप्रीत्यर्थ व स्व. भाऊसाहेब पाटणकर



# कार्यक्रमाची रूपरेषा

**कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत**
डॉ. दिलीप धोंडगे, प्रमुख कुसुमाग्रज अध्यासन
वेळ : सायं. ०६:०० ते ०६:१५

---

**दीपप्रज्वलन**
वेळ : सायं. ०६:१५

---

**अध्यक्षांचे आणि उपस्थित मान्यवरांचे स्वागत**
वेळ : सायं. ०६:३०

---

**मा. श्री. अमिताभ गुप्ता यांना पुरस्कार प्रदान**
वेळ : सायं. ०६:४५

---

**मा. श्री. अमिताभ गुप्ता यांचे मनोगत**
वेळ : सायं. ०७:००

---

**मा. श्री. निलीमकुमार यांना पुरस्कार प्रदान**
वेळ : सायं. ०७:३०

---

**मा. श्री. निलीमकुमार यांचे मनोगत**
वेळ : सायं. ०७:४५

---

**अध्यक्षीय भाषण**
मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे सर
वेळ : सायं. ०८:१५

---

**आभार**
मा. कुलसचिव श्री. दिलीप भरड सर

# कार्यक्रमाचे परिपत्रक


## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक- 422 222


क्र.: यचममुवि/कुका/२०२५/ दिनांक : १० फेब्रुवारी, २०२५

## परिपत्रक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाद्वारा कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार समारंभाचे खालील तपशिलाप्रमाणे आयोजन करण्यात आलेले आहे.

**दिनांक :** 12 **फेब्रुवारी**, 2025

**वेळ** : **सायं.** 5.30 **वा.**

**ठिकाण : मु.शं. औरंगाबादकर सभागृह, सार्वजनिक वाचनालय, नाशिक**

मा. कुलगुरू महोदयांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या समारंभास मा. प्र-कुलगुरू व मा.डॉ. चंद्रकांत पाटील, प्रसिद्ध कवी व अनुवादक आणि पुरस्कार निवड समिती अध्यक्ष यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या समारंभात श्री. अमिताभ गुप्ता, बंगाली भाषेतील प्रसिद्ध कवी व श्री. नीलिमकुमार, आसामी भाषेतील प्रसिद्ध कवी यांना अनुक्रमे सन 2022 आणि सन 2023 साठी कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

उपरोक्त प्रमाणे आयोजित केलेल्या समारंभास विद्यापीठातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर अधिकारी, कर्मचारी तसेच करारावरील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उपस्थित रहावे, ही विनंती.

11:02:25

(दिलीप भरड)
कुलसचिव

प्रत माहितीस्तव- मा. कुलगुरू कार्यालय
मा. प्र-कुलगुरू कार्यालय

प्रत : सर्व विद्याशाखा/विभाग संचालक,

सर्व विभाग, केंद्र, कक्ष प्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व सहकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

**दिनांक:** १२ फेब्रुवारी २०२५
**स्थळ:** मु. शं. औरंगाबादकर  सभागृह, सार्वजनिक वाचनालय, नाशिक
**आयोजक:** कुसुमाग्रज अध्यासन, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

## प्रस्तावना

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने विख्यात साहित्यिक वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी देशातील सुप्रसिद्ध अ-मराठी कवींना प्रदान करण्यात येणारा **कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार** हा अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार आहे. या पुरस्कारामध्ये **रु. १,००,०००/- रोख, मानपत्र आणि सन्मानचिन्हाचा** समावेश असतो. सन २०२३ आणि २०२४ साठी हा पुरस्कार वितरण सोहळा मु. शं. औरंगाबादकर  सभागृह, सार्वजनिक वाचनालय, नाशिक येथे पार पडला.

## पुरस्कार विजेते

- **कवी अमिताभ गुप्ता (सुप्रसिद्ध बंगाली कवी)**
- **कवी नीलिमकुमार (सुप्रसिद्ध आसामी कवी)**

## कार्यक्रमाची सुरुवात

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे होते. मंचावर सुप्रसिद्ध कवी व अनुवादक तसेच सदर पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. चंद्रकांत पाटील, कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे, कुलसचिव श्री. दिलीप भरड, पुरस्कारार्थी श्री. अमिताभ गुप्ता आणि श्री. निलीमकुमार हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. दत्ता पाटील यांनी केले.

## मुख्य भाषणे आणि विचारमंथन

कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी मराठी भाषेच्या जागतिक स्तरावरील प्रसारासाठी नियोजनबद्ध प्रयत्नांची गरज अधोरेखित केली. देशातील प्रत्येक विद्यापीठाने मराठी विभाग स्थापन करून भाषेच्या संवर्धनासाठी योगदान द्यावे, असे त्यांनी सांगितले.
डॉ. दिलीप धोंडगे यांनी कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर माहिती दिली आणि विजेत्यांच्या साहित्यकृतींचा गौरव केला.
सत्कारास उत्तर देताना...

**“लहानपणी आई वडिलांकडून या नाशिक शहराविषयी ‘जनस्थान’ नगरी म्हणून ऐकले होते. आज या पुरस्काराच्या निमित्ताने येथे यावयास मिळाले. कवी कुसुमाग्रज हे काव्याचा अविरत झरा होते,” असे अमिताभ गुप्ता यावेळी म्हणाले.**
**“हा पुरस्कार मिळणे माझ्यासाठी आनंदाचा क्षण आहे. त्यासोबत स्वत:च्या भाषेप्रती माझी जबाबदारी अधिक वाढली आहे. कविता माझा श्वास व माझे जगणे असून तीच माझा संसार व संवादाची भाषा असल्याचे भावोद्गार नीलिमकुमार यांनी काढले.”**

## कार्यक्रमाचा समारोप

साहित्य, कविता आणि संस्कृतीच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारा हा सोहळा उपस्थितांमध्ये साहित्याबद्दलची जागरूकता आणि अभिमान अधिक वृद्धिंगत करून गेला.

# "Kusumagraj National Literary Award 2023 – Program Report"

**Date:** 12 February 2025
**Venue:** M. S. Aurangabadkar Auditorium, Sarvajanik Vachanalay, Nashik
**Organiser:** Kusumagraj Chair, Yashwantrao Chavan Maharashtra Open University

## Introduction

On behalf of the Kusumagraj Chair of Yashwantrao Chavan Maharashtra Open University, the *Kusumagraj National Literature Award* is conferred every year in memory of eminent litterateur V. V. Shirwadkar (Kusumagraj) upon distinguished non-Marathi poets from across the country. This is a highly prestigious award that includes ₹1,00,000 in Cheque, a citation, and a memento. The award distribution ceremony for the years 2023 and 2024 was held at the M. S. Aurangabadkar Auditorium, Sarvajanik Vachanalay, Nashik

## Awardees

- Poet Amitabh Gupta (Renowned Bengali poet)
- Poet Neelimkumar (Renowned Assamese poet)

## Beginning of the Programme

The programme was presided over by Vice-Chancellor Prof. Sanjeev Sonawane. On the dais were distinguished poet and translator, as well as Chairman of the Award Selection Committee, Dr. Chandrakant Patil; Head of the Kusumagraj Chair, Dr. Dilip Dhondge; Registrar Mr. Dilip Bharad; Awardees Mr. Amitabh Gupta and Mr. Neelimkumar. The programme was compered by Mr. Datta Patil.

## Key Speeches and Reflections

Vice-Chancellor Prof. Sanjeev Sonawane emphasised the need for well-planned efforts for the global promotion of the Marathi language. He stated that every university in the country should establish a Marathi department and contribute to the preservation and promotion of the language.

Dr. Dilip Dhondge provided background information about the event and paid tribute to the literary works of the awardees.

## In Response to the Felicitation…

"When I was young, I heard from my parents about this city of Nashik as the 'Jansthan' city. Today, this award has given me the opportunity to come here. Poet Kusumagraj was an unceasing fountain of poetry," said Amitabh Gupta on the occasion.

"Receiving this award is a moment of joy for me. Along with it, my sense of responsibility towards my own language has increased. Poetry is my breath and my life, and it is my world and the language of my communication," expressed Neelimkumar.

## Conclusion of the Programme

Through literature, poetry, and culture, this ceremony conveyed a message of national unity and further enhanced the awareness and pride for literature among those present.

# समारंभाचे फोटो





दीपप्रज्वलन करताना विद्यापिठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे सर, कुसुमाग्रज अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे, पुरस्कारार्थी प्रसिद्ध बंगाली कवी मा. श्री. अमिताभ गुप्ता, पुरस्कारार्थी प्रसिद्ध आसामी कवी मा. श्री. नीलिमकुमार, मा. कुलसचिव दिलीप भरड, पुरस्कार निवड समिती अध्यक्ष व प्रसिद्ध कवी, अनुवादक मा. डॉ. चंद्रकांत पाटील.








कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना कुसुमाग्रज अध्यासन प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे सर.




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना श्री. दत्ता पाटील.



मा.कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे सरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना डॉ. दिलीप धोंडगे सर.



मा. श्री. अमिताभ गुप्ता यांचे स्वागत करताना डॉ. दिलीप धोंडगे सर.




मा. श्री. निलीमकुमार यांचे स्वागत करताना मा. कुलसचिव श्री. दिलीप भरड सर.




मा. डॉ. चंद्रकांत पाटील यांचे स्वागत करताना डॉ. दिलीप धोंडगे सर.



मा. श्री. अमिताभ गुप्ता (कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार २०२२) यांना सन्मानपत्र प्रदान करताना मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे सर.



मा. श्री. अमिताभ गुप्ता (कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार २०२२) यांना सन्मानचिन्ह प्रदान करताना मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे सर.



मा. श्री. अमिताभ गुप्ता मनोगत व्यक्त करताना.



मा. श्री. निलीमकुमार (कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार २०२३) यांना सन्मानपत्र प्रदान करताना मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे सर समवेत मान्यवर.



मा. श्री. निलीमकुमार (कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार २०२३) यांना सन्मानचिन्ह प्रदान करताना मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे सर समवेत मान्यवर.



मा. श्री. निलीमकुमार मनोगत व्यक्त करताना.



अध्यक्षीय भाषण करताना मा.
कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे सर.

आभार प्रदर्शन करताना मा.
कुलसचिव श्री. दिलीप भरड



समारंभासाठी उपस्थित मंडळी.





YCMOU PRO SMN P3 080125

## 'मुक्त'चा कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार

# अमिताभ गुप्ता, नीलिम कुमार यांना जाहीर

### रोख एक लाख रुपये, मानपत्र व मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप

नाशिक, दि. ७ (सा.वा.) – देश पातळीवर साहित्य क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या साहित्यिकांना यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या वतीने कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केला जातो. सन २०२२ चा हा पुरस्कार प्रसिद्ध बंगाली कवी अमिताभ गुप्ता आणि सन २०२३ चा पुरस्कार आसामी कवी नीलिम कुमार यांना जाहीर झाला आहे.

विद्यापीठाच्या कवी कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने सन २०१० पासून दरवर्षी देशातील साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी अमराठी कवीचा हा पुरस्कार देवून गौरव केला जातो. रोख एक लाख रुपये, मानपत्र व मानचिन्ह असे त्याचे स्वरूप आहे. सन २०२२




आणि २०२३ च्या पुरस्कारांची घोषणा आज करण्यात आली. सन २०२२च्या पुरस्काराचे मानकरी प्रसिद्ध बंगाली कवी अमिताभ गुप्ता असून, त्यांचे २०हून अधिक कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. समकालीन बंगाली काव्य विश्वातील प्रमुख कवी अशी त्यांची ओळख आहे. सन २०२३चा पुरस्कार आसामी कवी नीलिम कुमार यांना जाहीर झाला आहे. त्यांचे एकूण २४ कवितासंग्रह, तसेच इंग्रजी, हिंदी आणि पंजाबी अनुवादित पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कवितांचे फ्रेंच, स्पॅनिश, मराठीसह अनेक भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत.

पुरस्कारार्थींची निवड कुलगुरु प्रा. संजीव सोनवणे यांनी गठीत केलेल्या समितीने केली आहे. यात नामवंत कवी व अनुवादक प्रा. चंद्रकांत पाटील, डॉ. गोरख थोरात व डॉ. आसाराम लोमटे यांचा समावेश होता. समिती समन्वयक म्हणून कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी काम पाहिले. हा पुरस्कार वितरण सोहळा लवकरच आयोजित केला जाईल, अशी माहिती कुलसचिव दिलीप भरड यांनी दिली आहे.

YCMOU PRO MT M2 080125

**मुक्त विद्यापीठातर्फे नावांची घोषणा**

# कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार गुप्ता, कुमार यांना जाहीर

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाच्या माध्यमातून दरवर्षी देशातील महत्त्वाच्या अमराठी कवीला कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार दिला जातो. सन २०२२ चा पुरस्कार प्रसिद्ध बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांना आणि सन २०२३ चा पुरस्कार नीलिम कुमार या आसामी कवीला दिला जाणार आहे. एक लाख रुपये रोख, मानपत्र व मानचिन्ह, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

अमिताभ गुप्ता हे १९६५ पासून कविता लिहीत असून, त्यांचे आतापर्यंत २० हून अधिक कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. बंगाली भाषेतील लघु नियतकालिकांच्या आंदोलनातून काव्यलेखनाचा आरंभ करणारे अमिताभ गुप्ता हे नंतर समकालीन


अमिताभ गुप्ता


नीलिम कुमार

बंगाली कवितेच्या मध्यवर्ती प्रवाहातील लक्षणीय कवी म्हणून गणले जाऊ लागले. आसामी कवी नीलिम कुमार यांचे एकूण २४ कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या इंग्रजी अनुवादाचे तीन संग्रह, हिंदी अनुवादाचे तीन आणि पंजाबी अनुवादाचा एक संग्रह प्रकाशित आहेत. त्यांच्या कवितांचे फ्रेंच, स्पॅनिश आणि मराठीसह अनेक भारतीय भाषांत अनुवाद प्रसिद्ध आहेत. या कवींची निवड कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांनी स्थापन केलेल्या समितीने केली. समितीमध्ये नामवंत कवी व अनुवादक प्रा. चंद्रकांत पाटील, डॉ. गोरख थोरात व डॉ. आसाराम लोमटे यांचा समावेश आहे. समितीचे समन्वयक म्हणून विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी काम पाहिले. या दोन्ही कवींना पुरस्कार प्रदान करण्याचा कार्यक्रम लवकरच आयोजित करण्यात येणार असल्याचे विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड यांनी सांगितले. मुक्त विद्यापीठातर्फे हा पुरस्कार सन २०१० पासून सुरू झाला. आतापर्यंत चंद्रकांत देवताले (हिंदी), के. सच्चिदानंदन (मल्याळी), सीतांशू यशश्चंद्र (गुजराती), सुरजित पातर (पंजाबी), टेमसुला आओ (इंग्रजी), विष्णू खरे (हिंदी), एच. एस. शिवप्रकाश (कानडी), गुलजार या कवींना पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

YCMOU PRO SK S5 110225

# कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्काराचे उद्या वितरण

**नाशिक :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार प्रदान सोहळा बुधवारी (ता.१२) सायंकाळी साडेपाचला मु. शं. औरंगाबादकर सभागृहात आयोजित केला आहे. २०२२ चा पुरस्कार बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांना तर २०२३ चा पुरस्कार आघाडीचे आसामी कवी नीलिमकुमार यांना दिला जाणार आहे. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. कवी व अनुवादक आणि पुरस्कार निवड समिती अध्यक्ष डॉ. चंद्रकांत पाटील आणि विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन कार्यक्रमास उपस्थित राहातील. मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनातर्फे दरवर्षी भारतीय पातळीवरील महत्त्वाच्या अ-मराठी कवीला 'कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार' दिला जातो. हा पुरस्कार २०१० पासून सुरू झाला आहे. एक लाख रुपये रोख, मानपत्र व मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. यंदा २०२२ चा पुरस्कार प्रसिद्ध बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांना आणि २०२३ चा पुरस्कार नीलिमकुमार या आघाडीच्या आसामी कवीला प्रदान केला जाईल. या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन कुलसचिव दिलीप भरड, कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी केले आहे.

लोकमंथन

YCMOU PRO LKMN
P3 110225

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्काराचे उद्या बुधवारी वितरण

**लोकमंथन । प्रतिनिधी**

**नाशिक ।** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्काराचे उद्या बुधवार दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी समारंभपूर्वक वितरण करण्यात येणार आहे. सन २०२२ चा हा पुरस्कार प्रसिद्ध बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांना तर सन २०२३ चा पुरस्कार आघाडीचे आसामी कवी नीलिमकुमार यांना प्रदान करण्यात येणार आहे. शहरातील सार्वजनिक वाचनालय येथील मु. शं. औरंगाबादकर सभागृहात सायंकाळी साडेपाच वाजता हा कार्यक्रम होईल. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध कवी व अनुवादक आणि पुरस्कार निवड समिती अध्यक्ष डॉ. चंद्रकांत पाटील आणि विद्यापीठाचे प्र – कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन हे उपस्थित राहणार आहेत. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनातर्फे दरवर्षी भारतीय पातळीवरील महत्वाच्या अ-मराठी कवीला 'कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार' दिला जातो. हा पुरस्कार सन २०१० पासून सुरू झालेला आहे. भारतीय साहित्यात काव्यरूपी महत्वाचे योगदान देणारे चंद्रकांत देवताले (हिंदी), के. सच्चिदानंदन (मल्याळम), सीतांशू यशश्चंद्र (गुजराथी), सुरजीत पातर (पंजाबी), श्रीमती टेमसुला आओ (इंग्रजी), विष्णू खरे (हिंदी), एच. एस. शिवप्रकाश (कन्नड), कवी गुलजार इत्यादी कवींना आतापर्यंत या पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. रोख रक्कम एक लाख रुपये, मानपत्र व मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. त्यानुसार यंदा २०२२ चा पुरस्कार प्रसिद्ध बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांना आणि २०२३ चा पुरस्कार नीलिमकुमार या आघाडीच्या आसामी कवीला प्रदान करण्यात येणार आहे. अमिताभ गुप्ता हे १९६५ पासून कविता लिहीत असून त्यांचे आतापर्यंत २० हून अधिक कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. बंगालीतील लघुनियतकालिकांच्या आंदोलनातून काव्यलेखनाचा आरंभ करणारे अमिताभ गुप्ता नंतर समकालीन बंगाली कवितेच्या मध्यवर्ती प्रवाहातील लक्षणीय कवी म्हणून गणले जाऊ लागले. तसेच आसामी कवी नीलिम कुमार यांचे एकूण २४ कवितासंग्रह प्रकाशित असून त्यांच्या इंग्रजी अनुवादाचे तीन संग्रह, हिंदी अनुवादाचे तीन आणि पंजाबी अनुवादाचा एक संग्रह प्रकाशित आहे. त्यांच्या कवितांचे फ्रेंच, स्पॅनिश आणि मराठीसह अनेक भारतीय भाषांत अनुवाद प्रसिद्ध आहेत. विद्यापीठाचे मा. कुलगुरु प्रा. संजीव सोनवणे यांनी गठीत केलेल्या समितीने या पुरस्कारार्थींची निवड केले आहे. त्या समितीमध्ये नामवंत कवी व अनुवादक प्रा. चंद्रकांत पाटील, डॉ. गोरख थोरात व डॉ. आसाराम लोमटे यांचा समावेश होता. सदर महत्वाच्या कार्यक्रमास काव्यरसिक व साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून हा कार्यक्रम संस्मरणीय करावा असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव श्री. दिलीप भरड व विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे केले आहे.

Nashik Edition
Feb 11, 2025 Page No. 3
Powered by: erelego.com

YCMOU PRO BHR P5 110225

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा उद्या कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार समारंभ





**नाशिक (प्रमुख प्रतिनिधी)** :- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार उद्या (दि.१२) समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. सन २०२२ चा हा पुरस्कार प्रसिद्ध बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांना तर सन २०२३ चा पुरस्कार आघाडीचे आसामी कवी नीलिमकुमार यांना देण्यात येईल.

शहरातील सार्वजनिक वाचनालय येथील मु. शं. औरंगाबादकर सभागृहात सायंकाळी साडेपाच वाजता हा कार्यक्रम होईल. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार असून त्यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होईल. प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध कवी व अनुवादक आणि पुरस्कार निवड समिती अध्यक्ष डॉ. चंद्रकांत पाटील आणि विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन हे उपस्थित राहणार आहेत. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनातर्फे दरवर्षी भारतीय पातळीवरील महत्वाच्या अ-मराठी कवीला 'कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार' दिला जातो. हा पुरस्कार सन २०१० पासून सुरू झालेला आहे. भारतीय साहित्यात काव्यरूपी महत्वाचे योगदान देणारे चंद्रकांत देवताले (हिंदी), के. सच्चिदानंदन (मल्याळम), सीतांशू यशश्चंद्र (गुजराथी), सुरजीत पातर (पंजाबी), टेमसुला आओ (इंग्रजी), विष्णू खरे (हिंदी), एच. एस. शिवप्रकाश (कन्नड), कवी गुलजार आदी कवींना आतापर्यंत या पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. रोख रक्कम एक लाख रुपये, मानपत्र व मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. त्यानुसार यंदा २०२२ चा पुरस्कार प्रसिद्ध बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांना आणि २०२३ चा पुरस्कार नीलिमकुमार या आघाडीच्या आसामी कवीला प्रदान करण्यात येणार आहे. अमिताभ गुप्ता हे १९६५ पासून कविता लिहीत असून त्यांचे आतापर्यंत २० हून अधिक कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. बंगालीतील लघु नियतकालिकांच्या आंदोलनातून काव्यलेखनाचा आरंभ करणारे अमिताभ गुप्ता नंतर समकालीन बंगाली कवितेच्या मध्यवर्ती प्रवाहातील लक्षणीय कवी म्हणून गणले जाऊ लागले. तसेच आसामी कवी नीलिम कुमार यांचे एकूण २४ कवितासंग्रह प्रकाशित असून त्यांच्या इंग्रजी अनुवादाचे तीन संग्रह, हिंदी अनुवादाचे तीन आणि पंजाबी अनुवादाचा एक संग्रह प्रकाशित आहे. त्यांच्या कवितांचे फ्रेंच, स्पॅनिश आणि मराठीसह अनेक भारतीय भाषांत अनुवाद प्रसिद्ध आहेत. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी गठीत केलेल्या समितीने या पुरस्कारार्थींची निवड केली आहे. त्या समितीमध्ये नामवंत कवी व अनुवादक डॉ. चंद्रकांत पाटील, डॉ. गोरख थोरात व डॉ. आसाराम लोमटे यांचा समावेश होता. या कार्यक्रमास काव्यरसिक व साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून हा कार्यक्रम संस्मरणीय करावा, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड व विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी केले आहे.

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# मराठी भाषेला समृद्ध करण्याची जबाबदारी सर्वांची : कुलगुरू प्रा. सोनवणे

## मुक्त विद्यापीठातर्फे अमिताभ गुप्ता, नीलिमकुमारांना कुसुमाग्रज पुरस्कार प्रदान

**नाशिक ।** कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कारामुळे मराठी, बंगाली व आसामी या अभिजात भाषांची येथे सुरेख गुंफण झाल्याचे बघावयास मिळत आहे. मराठी भाषेला जरी नुकताच अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असला तरी तिला समृद्ध करण्याची जबाबदारी सर्वांची आहे. त्यासाठी मुक्त विद्यापीठात भाषा अनुवाद केंद्र सुरु आकरण्यात आलेले आहे. देशातील प्रत्येक विद्यापीठात मराठी विभाग होण्यासाठी व परदेशात देखील मराठीचा विस्तार करण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी येथे केले.

मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनातर्फे दिल्या जाणाऱ्या कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन नाशिक सार्वजनिक वाचनालयाच्या मु. शं. औरंगाबादकर सभागृहात बुधवारी (दि.१२) आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. कार्यक्रमात सन



२०२२ चा पुरस्कार बंगाली कवी अमिताभ गुप्ता आणि २०२३ चा पुरस्कार आघाडीचे आसामी कवी नीलिमकुमार यांना मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. एक लाख रुपये, मानपत्र, मानचिन्ह व शाल असे या पुरस्काराचे स्वरूप होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून कवी व अनुवादक आणि पुरस्कार निवड समिती अध्यक्ष डॉ. चंद्रकांत पाटील, विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड, कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. बंगाली कवी अमिताभ गुप्ता म्हणालेकी, बालपणी आई वडिलांकडून या नाशिक शहराविषयी 'जनस्थान' नगरी म्हणून ऐकले होते. या पुरस्काराच्या निमित्ताने येथे येण्यास मिळाले. कवी कुसुमाग्रज हे काव्याचा अविरत झरा होते.

निलीमकुमार म्हणाले की, हा पुरस्कार मिळणे हा माझ्यासाठी आनंदाचा क्षण आहे. त्यासोबत स्वत:च्या भाषेप्रती माझी जबाबदारी अधिक वाढली आहे. कवी व अनुवादक डॉ. चंद्रकांत पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी प्रास्ताविक केले. विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाचे सहयोगी सल्लागार दत्ता पाटील यांनी सूत्रसंचलन केले. कुलसचिव दिलीप भरड यांनी आभार मानले.

गावकरी
www.gavakari.net
11 Feb 2025 - Page 9
YCMOU PRO GK M9 110225

## कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्काराचे उद्या वितरण

**नाशिक : प्रतिनिधी** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार उद्या बुधवार दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. सन २०२२ चा हा पुरस्कार प्रसिद्ध बंगाली कवी श्री. अमिताभ गुप्ता यांना तर सन २०२३ चा पुरस्कार आघाडीचे आसामी कवी श्री. नीलिमकुमार यांना देण्यात येईल. शहरातील सार्वजनिक वाचनालय येथील मु. शं. औरंगाबादकर सभागृहात सायंकाळी साडेपाच वाजता हा कार्यक्रम होईल. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार असून त्यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होईल. प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध कवी व अनुवादक आणि पुरस्कार निवड समिती अध्यक्ष डॉ. चंद्रकांत पाटील आणि विद्यापीठाचे प्र - कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन हे उपस्थित राहणार आहेत. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनातर्फे दरवर्षी भारतीय पातळीवरील महत्वाच्या अ-मराठी कवीला 'कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार' दिला जातो. रोख रक्कम एक लाख रुपये, मानपत्र व मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. त्यानुसार यंदा २०२२ चा पुरस्कार प्रसिद्ध बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांना आणि २०२३ चा पुरस्कार नीलिमकुमार यांना प्रदान करण्यात येणार आहे.

YCMOU PRO MT S1 110225

## कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार उद्या प्रदान

**म. टा. प्रतिनिधी, नाशिक**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामार्फत उद्या (१२ फेब्रुवारी) कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार प्रदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. २०२२ चा हा पुरस्कार प्रसिद्ध बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांना, तर सन २०२३ चा पुरस्कार आघाडीचे आसामी कवी नीलिमकुमार यांना देण्यात येणार आहे. सार्वजनिक वाचनालयातील मु. शं. औरंगाबादकर सभागृहात सायंकाळी साडेपाच वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

अध्यक्षस्थान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे भूषविणार असून, त्यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होणार आहे. एक लाख रुपये, मानपत्र व मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

आपलं महानगर My महानगर
www.mymahanagar.com
YCMOU PRO APMN P2 110225

Quick News

## 'मुक्त'चा उद्या कुसुमाग्रज पुरस्कार समारंभ

✦ नाशिक । यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार बुधवारी (दि.१२) समारंभपूर्वक प्रदान करण्यात येणार आहे. दोन वर्षांचे पुरस्कार यावेळी देण्यात येतील. २०२२ चा पुरस्कार बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांना आणि २०२३ चा पुरस्कार आघाडीचे आसामी कवी नीलिमकुमार यांना देण्यात येणार आहे. सार्वजनिक वाचनालयातील औरंगाबादकर सभागृहात सायंकाळी ५.३० वाजता हा कार्यक्रम होईल. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार असून त्यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होईल. प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध कवी व अनुवादक आणि पुरस्कार निवड समिती अध्यक्ष डॉ. चंद्रकांत पाटील आणि विद्यापीठाचे प्र - कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन हे उपस्थित राहणार आहेत. विद्यापीठाचे मा. कुलगुरु प्रा. संजीव सोनवणे यांनी गठीत केलेल्या समितीने या पुरस्कारार्थीची निवड केली आहे. त्या समितीमध्ये नामवंत कवी व अनुवादक डॉ. चंद्रकांत पाटील, डॉ. गोरख थोरात व डॉ. आसाराम लोमटे यांचा समावेश होता. या कार्यक्रमास काव्यरसिक व साहित्यप्रेमींनी उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव दिलीप भरड व विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी केले आहे.

Nashik Edition
Feb 11, 2025 Page No. 2
Powered by: erelego.com

लोकमत YCMOU PRO LKMT S1 130225

# अमिताभ गुप्ता, नीलिमकुमार सन्मानित

### मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू संजीव सोनवणे यांच्या हस्ते कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार प्रदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** कविता ही प्रत्येकाच्या मनाची आणि हृदयाची भाषा आहे. त्यामुळे कविता लिहिताना सर्वांना आनंद आणि शांती देणारी लिहिली जावी, असा प्रयत्न कवीने करावा. या नगरीत कुसुमाग्रजांच्या नावाने पुरस्कार स्वीकारताना आनंद होत असून, या पुरस्काराने भाषा समृद्धीच्या कामासाठी ऊर्जा मिळेल, असे प्रतिपादन बंगाली भाषेतील ज्येष्ठ कवी अमिताभ गुप्ता यांनी केले. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते कवी गुप्ता आणि कवी नीलिमकुमार यांना 'कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनातर्फे आयोजित कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार वितरण समारंभात पुरस्काराप्रति मनोगत व्यक्त करताना ते बोलत होते. कुसुमाग्रज अध्यसनातर्फे दिला जाणारा 'कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार- २०२२' अमिताभ गुप्ता यांना, तर 'कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार- २०२३' आसामी भाषेतील कवी नीलिमकुमार यांना देण्यात आला. पुरस्कार वितरण सोहळा बुधवारी (दि. १२) सायंकाळी सार्वजनिक वाचनालयाच्या मु. शं. औरंगाबादकर सभागृहात उत्साहात पार पडला. याप्रसंगी मुक्त विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड, अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे, पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते दोन्ही पुरस्कारार्थींना पुरस्कार प्रदान करण्यात आले. शाल, स्मानपत्र, सन्मानचिन्ह आणि रोख




अमिताभ गुप्ता व नीलिमकुमार यांना पुरस्कार प्रदान करताना मान्यवर.

रक्कम असे पुरस्कारचे स्वरूप होते. याप्रसंगी दोन्ही कवींनी आपल्या मूळ भाषेतील काही कवितांचे सादरीकरण केले. प्रेक्षकांनीही कवितांना भरभरून दाद दिली. 'कवी मोजक्या शब्दांत जास्तीत जास्त भावना मांडत असतो. सामान्य व्यक्तीला ते जमत नाही. हाच कवी आणि सामान्य माणसातील मोठा फरक आहे. निवड समिती योग्य पुरस्कारार्थींची निवड करण्याचे शिवधनुष्य लीलया पेलले,' असे विद्यापीठाचे कुलगुरू संजीव सोनवणे यांनी यावेळी अध्यक्षीय मनोगतात सांगितले.

### कविता हा कवीचा गुप्त संसार : नीलिमकुमार

१ गत ४० हून अधिक वर्षांपासून कवितेशी जोडला गेला असून अनेक कवितांमुळे जीवे मारण्याच्या धमक्याही मिळल्या. परंतु मी कविता सोडली नाही.

२ कविता माझ्यासाठी श्वास असून, कविता लिहिल्याविना माझे जगणे कठीण आहे. कविता हा कवीचा गुप्त संसार असतो. माझ्यासाठी कविता हेच जीवन आणि संसार आहे.

३ या पुरस्कारामुळे माझी माझ्या भाषेप्रती अधिक जबाबदारी वाढली असल्याचे आसामी भाषेतील कवी नीलिमकुमार यांनी पुरस्कारप्रती भावना व्यक्त करताना सांगितले.

YCMOU PRO MT M6 130225

# अमिताभ गुप्ता, नीलिमकुमार यांचा गौरव

## कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार प्रदान



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे बंगाली कवी अमिताभ गुप्ता व आसामी कवी नीलिमकुमार यांचा गौरव करण्यात आला.

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे अमराठी कवीला दिला जाणारा वर्ष २०२२ साठीचा कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार ज्येष्ठ बंगाली कवी अमिताभ गुप्ता व वर्ष २०२३ साठीचा पुरस्कार ख्यातनाम आसामी कवी नीलिमकुमार यांना बुधवारी (दि.१२) प्रदान करण्यात आला. विद्यापीठाचे कुलगुरू व कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. संजीव सोनवणे यांच्या हस्ते 'सावाना'च्या मु. शं. औरंगाबादकर सभागृहात त्यांना गौरविण्यात आले. एक लाख रुपये रोख, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

अध्यक्षीय स्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. सोनवणे म्हणाले की, विद्यापीठाचे कुसुमाग्रज अध्यासन मराठी भाषेची सेवा करीत आहे. विचारधारा समृद्ध करण्याचे काम अध्यासन आणि मुक्त विद्यापीठ यांच्या माध्यमातून होत आहे. भाषेसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान हा त्यातील एक महत्त्वाचा भाग आहे. आता मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला आहे. पण पुढे काय? याचा विचार व्हायला हवा. देश पातळीवर प्रत्येक विद्यापीठात मराठी विभाग व्हावा यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. या वेळी पुरस्कार निवड समिती अध्यक्ष डॉ. चंद्रकांत पाटील यांनी दोन्ही कवींच्या काव्यसाधनेची माहिती दिली. विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी उपस्थितांचे स्वागत व परिचय करून दिला. प्रा. दत्ता पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. दिलीप भरड यांनी आभार मानले.

**'...जनस्थानात येण्याचा योग आला'**

पुरस्कार स्वीकारल्यानंतर अमिताभ गुप्ता म्हणाले की, नाशिक अर्थात पूर्वीच्या जनस्थाविषयी खूप ऐकले होते. जवळपास सात दशकांनंतर अखेर या पुरस्कारानिमित्त जनस्थानात येण्याचा योग आला. कुसुमाग्रजांच्या नावाने दिला जाणारा पुरस्कार मिळणे आनंदाची गोष्ट आहे. त्यांनी कविता बंगाली भाषेसह इंग्रजीमध्येही सादर केल्या.

**'कविता ही आयुष्याशी संवादाची भाषा'**

नीलिमकुमार म्हणाले की, कविता करतो म्हणून मला जीवघेण्या धमक्याही मिळाल्या. पण, कवितेची साथ सुटू शकली नाही. कविता ही माझी आयुष्याशी संवाद साधण्याची भाषा आहे. ४० वर्षांपासून अधिक वर्षे मी कवितेशी जोडलो गेलो आहे. यासाठी मिळालेला हा पुरस्कार माझी जबाबदारी वाढविणार आहे.

---

# देशदूत

नाशिक आवृत्ती

epaper.deshdoot.com
13 Feb 2025 - Page 9

YCMOU PRO DT M9 130225

# कवी अमिताभ गुप्ता, नीलिमकुमार यांना कुसुमाग्रज पुरस्कार प्रदान

**नाशिक ।** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे आज कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांना तर २०२३ चा पुरस्कार आसामी कवी नीलिमकुमार यांना कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

एक लाख रुपये रोख, मानपत्र व मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते. याप्रसंगी पुरस्कार निवड समिती अध्यक्ष डॉ. चंद्रकांत पाटील, विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड, कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे उपस्थित होते. कुलगुरु डॉ. सोनवणे म्हणाले, की पुरस्कारासाठी यथोचित कवी निवडण्याचे शिवधनुष्य निवड समितीने यशस्वीरित्या पेलले आहे. कुसुमाग्रजांचे श्रेष्ठत्व पाळण्याचे, टिकविण्याचे व त्यात भर घालण्याचे काम या पुरस्काराच्या माध्यमातून होते आहे. सत्काराला उत्तर देताना अमिताभ गुप्ता म्हणाले, की आपल्या पालकांसोबत नाशिकला येणे झाले होते. सात दशकांनंतर पुन्हा नाशिकला येतांना मनस्वी आनंद होतो आहे. प्रत्येक व्यक्तीमध्ये कवी दडला असून, जीवन सुखी-समृद्ध करण्याची क्षमता कवितेत असल्याचे त्यांनी नमुद केले.

---

YCMOU PRO SMN P3 140225

# कवितेच्या माध्यमातून विश्वशांती प्रस्थापित व्हावी

## प्रसिद्ध बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांचे प्रतिपादन | मुक्त विद्यापीठाचे कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार प्रदान

नाशिक, दि. १३ (सा.वा.) - कविता ही प्रत्येकाच्या हृदयासह मनाची भाषा आहे. तिच्या माध्यमातून विश्वशांतीचे उद्दिष्ट साध्य व्हायला हवे, असे प्रतिपादन प्रसिद्ध बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांनी केले.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने दरवर्षी हिंदुस्थानी साहित्यातील योगदानासाठी कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार अमराठी साहित्यिकास प्रदान केला जातो. रोख रक्कम एक लाख, मानपत्र व मानचिन्ह असे त्याचे स्वरूप आहे. सन २०२२ चा हा पुरस्कार अमिताभ गुप्ता यांना, तर सन २०२३ चा पुरस्कार आसामी कवी नीलिमकुमार यांना कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते देऊन गौरवण्यात आले. हा सोहळा बुधवारी सायंकाळी सावानाच्या मु. शं. औरंगाबादकर सभागृहात संपन्न झाला. या वेळी सत्काराला उत्तर देताना गुप्ता बोलत होते. कविवर्य कुसुमाग्रज यांच्या नावाने हा पुरस्कार मिळाल्याचा आनंद मोठा आहे. पुरस्काराने भाषा समृद्धीच्या कार्यासाठी ऊर्जा मिळाल्याचे ते म्हणाले. कविता ही आनंद, शांती देणारी असावी, त्यातून विश्वशांती प्रस्थापित व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



कवी नीलिमकुमार म्हणाले की, चाळीसहून अधिक वर्षे कवितेशी जोडलेला असून, याशिवाय माझे जगणे कठीण आहे. या लेखनामुळे जीवे मारण्याच्या धमक्याही आल्या तरी काव्यलेखन सोडले नाही. पुरस्कारामुळे भाषेप्रती जबाबदारी वाढली आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

कुलगुरू प्रा. सोनवणे यांनी अध्यक्षीय मनोगत मांडले. निवड समितीने योग्य पुरस्कारार्थींची निवड केली असून, कविवर्य कुसुमाग्रजांच्या भूमीत त्यांचा सन्मान होत आहे. या भूमीने कायमच अस्सलता जपली आहे, असे ते म्हणाले. या सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध कवी, अनुवादक, पुरस्कार निवड समिती अध्यक्ष डॉ. चंद्रकांत पाटील, कुलसचिव दिलीप भरड उपस्थित होते. प्रास्ताविक अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी, तर सूत्रसंचालन दत्ता पाटील यांनी केले. गुप्ता यांनी बंगाली भाषा यासह त्यांच्या मराठी, इंग्रजी अनुवादित कविता ऐकवल्या, तर नीलिमकुमार यांनी बारीश, भला आदमी या हिंदीतील व मीठ या आसामी कवितेचे सादरीकरण केले.

---

# लोकमत

YCMOU PRO LKMT S4 110225

# कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्काराचे उद्या वितरण

**नाशिक :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्काराचे वितरण बुधवारी (दि. १२) होणार आहे. २०२२ चा हा पुरस्कार प्रसिद्ध बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांना, तर २०२३ चा पुरस्कार आघाडीचे आसामी कवी नीलिमकुमार यांना प्रदान करण्यात येणार आहे. येथील मु. शं. औरंगाबादकर सभागृहात सायंकाळी साडेपाच वाजता हा कार्यक्रम होईल.

मुंबई तरुण भारत
Main Edition | 2025-02-12 | Page- 9
epaper.mahamtb.con
YCMOU PRO MTBH P9 110225

# ‘कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कारा’चे आज वितरण

**नाशिक, दि. ११ : प्रतिनिधी**

‘कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार’ वितरणाचा कार्यक्रम बुधवार, दि. १२ जानेवारी रोजी सार्वजनिक वाचनालय नाशिक येथील मु. शं. औरंगाबादकर सभागृह येथे सायंकाळी ५.३० वाजता होणार आहे. ‘यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठा’कडून हा पुरस्कार देण्यात येतो. प्रसिद्ध बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांना २०२२ सालचा, तर आसामी कवी नीलिम कुमार यांना २०२३ सालचा पुरस्कार देण्यात येणार आहे. मानपत्र, मानचिन्ह आणि एक लाख रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहणार असून त्यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होईल.

**अमिताभ गुप्ता आणि नीलिम कुमार मानकरी**

प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध कवी व अनुवादक आणि पुरस्कार निवड समिती अध्यक्ष डॉ. चंद्रकांत पाटील आणि विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन हे उपस्थित राहणार आहेत. ‘यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठा’च्या कुसुमाग्रज अध्यासनातर्फे दरवर्षी भारतीय पातळीवरील महत्त्वाच्या बिगर मराठी कवीला ‘कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कारा’ने गौरविण्यात येते. २०१० सालापासून या पुरस्काराला सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाला काव्यरसिक व साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड व कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी केले आहे.

पुण्य नगरी

# देश–विदेशांत मराठीच्या विस्तारासाठी नियोजनबद्ध प्रयत्न हवेत : डॉ. सोनवणे

## मुक्त विद्यापीठातर्फे कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कारांचे वितरण



**नाशिक :** मराठी भाषेला जरी नुकताच अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असला तरी तिला समृद्ध करण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे. त्यासाठी विद्यापीठात भाषा अनुवाद केंद्र सुरू करण्यात आलेले आहे. तसेच, देशातील प्रत्येक विद्यापीठात मराठी विभाग तयार होण्यासाठी व परदेशात देखील मराठीचा विस्तार करण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न हवेत, असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी केले.

सार्वजनिक वाचनालयाच्या मु. शं. औरंगाबादकर सभागृहात आयोजित विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनातर्फे दिल्या जाणाऱ्या कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार वितरण समारंभप्रसंगी अध्यक्ष स्थानावरून डॉ. सोनवणे बोलत होते. कार्यक्रमात २०२२ चा हा पुरस्कार प्रसिद्ध बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांना, तर २०२३ चा पुरस्कार आघाडीचे आसामी कवी नीलिमकुमार यांना प्रदान करण्यात आला. रोख रक्कम एक लाख रुपये, मानपत्र, मानचिन्ह व शाल असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध कवी व अनुवादक आणि पुरस्कार निवड समिती अध्यक्ष डॉ. चंद्रकांत पाटील, विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड, कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.

सत्कारास उत्तर देताना बंगाली कवी अमिताभ गुप्ता म्हणाले की, लहानपणी ‘जनस्थान’ नगरी विषयी ऐकले होते. आज या पुरस्काराच्या निमित्ताने येथे येण्यास मिळाले. कवी कुसुमाग्रज हे काव्याचा अविरत झरा होते, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

आसामी कवी नीलीमकुमार म्हणाले की, हा पुरस्कार मिळणे हा माझ्यासाठी आनंदाचा क्षण आहे त्यासोबत स्वतःच्या भाषेप्रति माझी जबाबदारी अधिक वाढली आहे. कविता माझा श्वास व माझे जगणे असल्याचे भावोद्गार देखील त्यांनी काढले. डॉ. चंद्रकांत पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. दिलीप धोंडगे यांनी प्रास्ताविक व दत्त पाटील यांनी सूत्रसंचालन केले तर दिलीप भरड यांनी आभार मानले.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com
YCMOU PRO PD M5 080125


# अमिताभ गुप्ता, नीलिम कुमार कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्काराचे मानकरी

**• मुक्त विद्यापीठातर्फे घोषणा**


**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे कुसुमाग्रज अध्यासनाच्या माध्यमातून दिले जाणारे कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार घोषित करण्यात आलेत. २०२२ च्या पुरस्कारासाठी प्रसिद्ध बंगाली कवी अमिताभ गुप्ता, तर २०२३ च्या पुरस्कारासाठी आसामी कवी नीलिम कुमार यांची निवड करण्यात आली.

मुक्त विद्यापीठातर्फे दरवर्षी अमराठी कवीला कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार दिला जातो.



अमिताभ गुप्ता



नीलिम कुमार

गेल्या २०१० पासून या पुरस्कारांची परंपरा सुरू झाली असून, आतापर्यंत भारतीय कवितेत महत्त्वाची भर घालणाऱ्या चंद्रकांत देवताले (हिंदी), के. सच्चिदानंदन (मल्याळम), सीतांशू यशश्चंद्र (गुजराथी), सूरजित पातर (पंजाबी), श्रीमती टेमसुला आओ (इंग्रजी), विष्णू खरे (हिंदी), एच. एस. शिवप्रकाश (कन्नड), गुलजार आदी कवींना हा पुरस्कार दिला गेला आहे. पुरस्कारार्थीला रोख रक्कम एक लाख रुपये, मानपत्र व मानचिन्ह देण्यात येते. अमिताभ गुप्ता हे १९६५ पासून कविता लिहीत असून, त्यांचे आतापर्यंत २० हून अधिक कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. बंगालीतील लघुनियतकालिकांच्या आंदोलनातून काव्यलेखनाचा आरंभ करणारे अमिताभ गुप्ता नंतर समकालीन बंगाली कवितेच्या मध्यवर्ती प्रवाहातील लक्षणीय कवी म्हणून गणले जाऊ लागले.

आसामी कवी नीलिम कुमार यांचे एकूण २४ कवितासंग्रह प्रकाशित झाले असून, त्यांच्या इंग्रजी अनुवादाचे तीन संग्रह, हिंदी अनुवादाचे तीन आणि पंजाबी अनुवादाचा एक संग्रह प्रकाशित असून, त्यांच्या कवितांचे फ्रेंच, स्पॅनिश आणि मराठीसह अनेक भारतीय भाषांत अनुवाद प्रसिद्ध आहेत. या कवींची निवड मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांनी नियुक्त केलेल्या समितीने केली आहे. समितीमध्ये नामवंत कवी व अनुवादक प्रा. चंद्रकांत पाटील, डॉ. गोरख थोरात व डॉ. आसाराम लोमटे यांचा समावेश होता. समितीचे समन्वयक म्हणून विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी काम पहिले.

# गुप्ता, नीलिम कुमार यांना कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे २०२२, २३ च्या पुरस्कारांची घोषणा

**सकाळ वृत्तसेवा**

नाशिक, ता. ७ : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनातर्फे कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्काराची घोषणा केली आहे. २०२२ चा पुरस्कार बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांना आणि २०२३ चा पुरस्कार असामी येथील कवी नीलिम कुमार यांना जाहीर झाला आहे.

मुक्त विद्यापीठातर्फे कुसुमाग्रज अध्यासनाच्या माध्यमातून दरवर्षी राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाच्या अमराठी कवीला कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार दिला जातो. २०१० पासून हा पुरस्कार सुरू झाला असून, आतापर्यंत भारतीय कवितेत महत्त्वाची भर


अमिताभ गुप्ता


नीलिम कुमार

घालणाऱ्या चंद्रकांत देवताले (हिंदी), के. सच्चिदानंदन (मल्याळम), सीतांशु यशश्चंद्र (गुजराती), सुरजीत पातर (पंजाबी), टेमसुला आओ (इंग्रजी), विष्णू खरे (हिंदी), एच. एस. शिवप्रकाश (कन्नड), गुलजार आदी कवींना प्रदान केला आहे. एक लाख रुपये, मानपत्र व मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

सन २०२२ चा पुरस्कार बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांना जाहीर झाला. १९६५ पासून ते कविता लिहीत असून, त्यांचे आतापर्यंत २० हून अधिक कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. बंगालीतील लघुनियतकालिकांच्या आंदोलनातून काव्यलेखनाचा प्रारंभ करणारे अमिताभ गुप्ता नंतर समकालीन बंगाली कवितेच्या मध्यवर्ती प्रवाहातील लक्षणीय कवी म्हणून गणले जाऊ लागले.

असामी कवी नीलिम कुमार यांना २०२३ चा पुरस्कार जाहीर झाला असून, त्यांचे २४ कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. त्यांच्या इंग्रजी अनुवादाचे तीन संग्रह, हिंदी अनुवादाचे तीन आणि पंजाबी अनुवादाचा एक संग्रह प्रकाशित झाला. त्यांच्या कवितांचे फ्रेंच, स्पॅनिश आणि मराठीसह अनेक भारतीय भाषांत अनुवाद प्रसिद्ध आहेत.

या कवींची निवड कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांनी गठीत केलेल्या समितीने केली. समितीत कवी व अनुवादक प्रा. चंद्रकांत पाटील, डॉ. गोरख थोरात व डॉ. आसाराम लोमटे यांचा समावेश होता. समितीचे समन्वयक म्हणून विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांनी काम पाहिले. पुरस्कार वितरण कार्यक्रमाचा तपशील यथावकाश जाहीर केला जाणार असल्याची माहिती विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड यांनी दिली.

लोकसत्ता

YCMOU PRO LKST M7 140225

# विद्यापीठांमध्ये मराठी भाषा विभागाची गरज

## कुसुमाग्रज पुरस्कार सोहळ्यात कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांचे प्रतिपादन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक :** मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने देशपातळीवर प्रत्येक विद्यापीठात मराठी भाषा विभाग होण्याची आवश्यकता यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजय सोनवणे यांनी विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासन केंद्राच्या वतीने देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पुरस्कार सोहळ्यात मांडली. मराठीप्रमाणेच अभिजात भाषेचा दर्जा मिळालेल्या बंगाली आणि आसामी भाषेतील कवींचा पुरस्काराने गौरव करताना आनंद वाटत असल्याचे त्यांनी सांगितले.

मुक्त विद्यापीठातील कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने राष्ट्रीय पातळीवरील अमराठी कवींना कुसुमाग्रज पुरस्काराने दरवर्षी गौरविण्यात येते. शहरातील सार्वजनिक वाचनालयाच्या मु. शं. औरंगाबादकर सभागृहात बुधवारी सायंकाळी पुरस्कार सोहळा झाला.



नाशिक येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय पुरस्काराने बंगाली कवी अमिताभ गुप्ता आणि आसामी कवी नीलिमकुमार यांना कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते गौरवण्यात आले.

२०२२ या वर्षासाठी बंगाली कवी अमिताभ गुप्ता आणि २०२३ या वर्षासाठी आसामी कवी नीलिमकुमार यांना विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. सोनवणे यांच्या हस्ते पुरस्काराने गौरविण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप रुपये एक लाख, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, महावस्त्र असे होते.

यावेळी कुलगुरू सोनवणे यांनी, अध्यासन तसेच मुक्त विद्यापीठाच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहिती दिली. मराठी भाषा, विचारधारा समृद्ध करण्याचे काम विद्यापीठ करत आहे. नाशिककर अस्सल असून

### अमराठी कवींचा गौरव

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील कुसुमाग्रज अध्यासनाच्या वतीने दरवर्षी राष्ट्रीय पातळीवरील प्रसिध्द अमराठी कवींना कुसुमाग्रज पुरस्काराने गौरविण्यात येते. २०२२ या वर्षासाठी बंगाली कवी अमिताभ गुप्ता आणि २०२३ या वर्षासाठी आसामी कवी नीलिमकुमार यांना बुधवारी सायंकाळी झालेल्या कार्यक्रमात गौरविण्यात आले. दोघा पुरस्कारार्थींनी कुसुमाग्रज यांच्या नावाने असलेला पुरस्कार मिळाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

अस्सल नाशिककरांनी बंगाली तसेच आसामी भाषेतील अस्सल कवींचा सन्मान केल्याचे त्यांनी नमूद केले. पुरस्काराला उत्तर देतांना अमिताभ गुप्ता यांनी, कुसुमाग्रज यांचे मराठी साहित्यातील योगदान महत्त्वाचे असल्याने त्यांच्या नावे असलेल्या पुरस्काराने गौरविण्यात येत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

या पुरस्काराने साहित्य लेखन अधिक सकस पद्धतीने करण्याची उर्मी मिळाली असल्याचे सांगितले. कवी नीलिमकुमार यांनी, शब्द आणि कविता हा आपला संसार असून कविता हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग असल्याचे नमूद केले. कुसुमाग्रजांच्या नावे पुरस्कार मिळणे हे सौभाग्य असून या पुरस्काराने जबाबदारी अधिक वाढली असल्याचे सांगितले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून कवी तथा अनुवादक, पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. चंद्रकांत पाटील, कुलसचिव डॉ. दिलीप भरड, अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे उपस्थित होते. यावेळी नीलिमकुमार यांनी बारीश आणि भला आदमी या कवितांचे वाचन केले. प्रा. धोंडगे यांनी प्रास्ताविक केले. दत्ता पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

मुंबई तरुण भारत

Main Edition | 2025-02-14 | Page- 9
epaper.mahamtb.con

YCMOU PRO TBH
P9 140225

# मराठी, बंगाली व आसामीची सुरेख गुंफण : प्रा. संजीव सोनवणे

## 'कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार' वितरण संपन्न

**नाशिक, दि. १३ : प्रतिनिधी**

''कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कारा'मुळे मराठी, बंगाली व आसामी या अभिजात भाषांची येथे सुरेख गुंफण झाल्याचे बघावयास मिळत आहे. मराठी भाषेला जरी नुकताच 'अभिजात' भाषेचा दर्जा मिळाला असला, तरी तिला समृद्ध करण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे. त्यासाठी विद्यापीठात भाषा अनुवाद केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. तसेच, देशातील प्रत्येक विद्यापीठात मराठी विभाग होण्यासाठी व परदेशातदेखील मराठीचा विस्तार करण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न हवे,'' असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. संजीव सोनवणे यांनी केले.

सार्वजनिक वाचनालयाच्या मु. शं. औरंगाबादकर सभागृहात नुकत्याच आयोजित विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनातर्फे दिल्या जाणाऱ्या 'कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार' वितरण समारंभाप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. कार्यक्रमात सन २०२२चा पुरस्कार



प्रसिद्ध बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांना, तर सन २०२३चा पुरस्कार आसामी कवी नीलिमकुमार यांना प्रदान करण्यात आला. रोख रक्कम एक लाख रुपये, मानपत्र, मानचिन्ह व शाल असे या पुरस्काराचे स्वरूप होते. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध कवी व अनुवादक आणि पुरस्कार निवड समिती अध्यक्ष डॉ. चंद्रकांत पाटील, विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड, कुसुमाग्रज अध्यासनाचे प्रमुख डॉ. दिलीप धोंडगे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. कुसुमाग्रजांच्या नावे दिल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी त्यांच्या या अस्सल भूमीत अस्सल कवींची निवड करण्यात आल्याचे कुलगुरु सोनवणे यांनी आपल्या भाषणात सांगितले. प्रास्ताविक डॉ. दिलीप धोंडगे यांनी केले. सूत्रसंचलन दत्ता पाटील, आभारप्रदर्शन दिलीप भरड यांनी केले. यावेळी 'विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ' सदस्य डॉ. संजीवनी महाले, परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटील यांच्यासह विद्यापीठ विद्याशाखा संचालक, अधिकारी, कर्मचारी, शैक्षणिक संयोजक, विद्यार्थी आदिंसह साहित्यप्रेमी उपस्थित होते.

### सत्कारास उत्तर देताना...

- ''लहानपणी आई वडिलांकडून या नाशिक शहराविषयी 'जनस्थान' नगरी म्हणून ऐकले होते. आज या पुरस्काराच्या निमित्ताने येथे यावयास मिळाले. कवी कुसुमाग्रज हे काव्याचा अविरत झरा होते,'' असे अमिताभ गुप्ता यावेळी म्हणाले.
- हा पुरस्कार मिळणे माझ्यासाठी आनंदाचा क्षण आहे. त्यासोबत स्वतःच्या भाषेप्रती माझी जबाबदारी अधिक वाढली आहे. कविता माझा श्वास व माझे जगणे असून तीच माझा संसार व संवादाची भाषा असल्याचे भावोद्गार नीलिमकुमार यांनी काढले.

Powered by iDocuments

DESHDOOT Times
...watching north maharashtra

# Kusumagraj National Awards announced




**NASHIK:** The Yashwantrao Chavan Maharashtra Open University (YCMOU) has announced the recipients of its prestigious Kusumagraj National Award for 2022 and 2023. This annual award, instituted in 2010, honours notable non-Marathi poets for their significant contributions to Indian poetry. Recipients are presented with a cash prize of Rs. 1 lakh, a citation, and a memento.

For 2022, the award has been conferred upon renowned Bengali poet Amitabh Gupta. A celebrated figure in Bengali literature, Gupta began his poetic journey in 1965 through the Bengali short-periodical movement. Over the decades, he has published more than 20 collections of poetry, establishing himself as a prominent voice in contemporary Bengali poetry.

The 2023 award recognizes leading Assamese poet Neelim Kumar. Kumar has an extensive body of work, comprising 24 poetry collections and translations of his works in English, Hindi, Punjabi, and several Indian languages, including Marathi. His poems have also been translated into international languages like French and Spanish, underscoring his wide-ranging influence.

The selection of the awardees was made by a committee chaired by YCMOU Vice Chancellor Prof. Sanjeev Sonawane. The panel included distinguished poets and translators Prof. Chandrakant Patil, Dr. Gorakh Thorat, and Dr. Asaram Lomte. Dr. Dilip Dhondge, head of YCMOU's Kusumagraj Dais, coordinated the process.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

YCMOU PRO LKST P9 120225

# कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार सोहळा आज

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नाशिक** : येथील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार सोहळा बुधवारी सायंकाळी ५.३० वाजता सार्वजनिक वाचनालय नाशिकच्या मु. शं. औरंगाबादकर सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

विद्यापीठाच्या वतीने २०२२ चा पुरस्कार बंगाली कवी अमिताभ गुप्ता यांना तर, २०२३ चा पुरस्कार आसामी कवी नीलिमकुमार यांना देण्यात येईल. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्याहस्ते पुरस्कारांचे वितरण होईल. प्रमुख पाहुणे म्हणून कवी, अनुवादक आणि पुरस्कार निवड समिती अध्यक्ष डॉ. चंद्रकांत पाटील, विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन उपस्थित राहणार आहेत. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनातर्फे दरवर्षी भारतीय पातळीवरील महत्वाच्या अमराठी कवीला 'कुसुमाग्रज राष्ट्रीय पुरस्कार' दिला जातो. हा पुरस्कार २०१० पासून देण्यात येत आहे. रोख एक लाख रुपये, मानपत्र व मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. २०२२ चे पुरस्कारार्थी अमिताभ गुप्ता यांचे आतापर्यंत २० हून अधिक कवितासंग्रह प्रकाशित झाले आहेत. बंगालीतील लघुनियतकालिकांच्या आंदोलनातून काव्यलेखनाचा आरंभ करणारे गुप्ता नंतर समकालीन बंगाली कवितेच्या मध्यवर्ती प्रवाहातील लक्षणीय कवी म्हणून गणले जाऊ लागले. २०२३ चे पुरस्कारार्थी आसामी कवी नीलिमकुमार यांचे २४ कवितासंग्रह प्रकाशित असून त्यांच्या इंग्रजी अनुवादाचे तीन संग्रह, हिंदी अनुवादाचे तीन आणि पंजाबी अनुवादाचा एक संग्रह प्रकाशित आहे. त्यांच्या कवितांचे फ्रेंच, स्पॅनिश आणि मराठीसह अनेक भारतीय भाषांत अनुवाद प्रसिद्ध आहेत.

## कार्यक्रम सदस्य

पुढील सदस्यांनी विविध जबाबदारी सांभाळत हा कार्यक्रम आयोजित केला.

| | | |
|---|---|---|
| **डॉ. दिलीप धोंडगे** | **:** | **अध्यासन प्रमुख** |
| श्री. दिलीप भरड, कुलसचिव | : | समिती सदस्य |
| श्री. सुनील निकम | : | समिती सदस्य |
| श्री. महेंद्र बनसोडे | : | समिती सदस्य |
| श्री. अभय कुलकर्णी | : | समिती सदस्य |
| श्री. परेश शिऊरकर | : | समिती सदस्य |
| श्री. दत्ता पाटील | : | समिती सदस्य |
| श्री. सचिन शिंदे | : | समिती सदस्य |
| कु. ऋषिकेश गांगुर्डे | : | मदतनीस |

-------------------------------------- **समाप्त** --------------------------------------